# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या
# कार्यकारी समिती (Executive Committee) चा
# दिनांक १४ मे, २०१८ रोजी आयोजित ६ व्या सभेचा कार्यवृत्तांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची ६ वी सभा सोमवार, दिनांक १४ मे, २०१८ रोजी दुपारी ०३.३० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली " **टकले सभागृह** ", **वनभवन**, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समिती सदस्यांची व निमंत्रित अधिकाऱ्यांची यादी ***(परिशिष्ट-१)*** नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य-सचिव यांनी सहाव्या सभेच्या सुरूवातीस नवनियुक्त मा.अध्यक्षांचे स्वागत केले व इतर उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे स्वागताअंती समस्त उपस्थिताचा परिचय करून दिला. तसेच मा. अध्यक्षांचे परवानगीने विषयसूचीनुसार सभेच्या कामकाजास सुरूवात केली.

**विषय क्र.१ :- मे.तक्षा कंसल्टंट, ठाणे व मे. शहा टेक्निकल कंसल्टंट प्रा.लि., मुंबई यांचे नियुक्तीस शिफारस करणेबाबत व मे. तक्षा कंसल्टंट यांनी तयार केलेल्या DPR ला व मे. शहा टेक्निकल कंसल्टंट प्रा.लि., मुंबई यांचे संकल्पनात्मक टिपणीला मान्यता देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांकःडब्ल्यूएलपी ०४.१७/प्र.क्र.१२१/भाग-१/फ-१ दि.१४ मार्च, २०१८ चे अनुषंगाने विषयांकित प्रकरणी मान्यता देण्यासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव समितीपुढे सादर करण्यात आला.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, येथील आर्किटेक्ट कंसल्टंट नियुक्त करण्यास्तव शासनाची कार्योत्तर मंजूरी मिळवण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला होता. त्यावर शासनाने समितीची शिफारस मागितलेली आहे.

सदस्य-सचिव यांनी मा. अध्यक्षांचे परवानगीने सदर विषय चर्चेसाठी समितीपुढे मांडला व मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना प्रकल्पाचे सादरीकरण करण्यास विनंती केली. त्यानुसार मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी

राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामधील आर्किटेक्ट कंसल्टंट यांच्या नियुक्तीबाबत आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत समितीला माहिती दिली. त्यात त्यांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवलीकरिता आर्किटेक्ट कंसल्टंट यांच्या नियुक्तीसाठी दोन प्रकारच्या निविदा काढण्यात आल्याचे सांगितले. त्यातील एक जागतिक स्तरावरील आर्किटेक्ट कंसल्टंट नियुक्तीकरीता होती व दुसरी स्थानिक स्तरावरील आर्किटेक्ट कंसल्टंटकरीता होती. त्यापैकी जागतिक स्तरावरील निविदा मे. शहा टेक्निकल कंसल्टंट प्रा.लि. मुंबई यांना व स्थानिक स्तरावरील निविदा मे. तक्षा कंसल्टंट, ठाणे यांनी कमित कमी निविदा रक्कम प्रस्तावित केल्याने नियुक्तीकरिता शिफारस केल्याचे सांगितले. सन २०१५-१६ या वर्षातील (२६०६-२२९५) या निसर्ग पर्यटन शीर्षाखालील वन विभागाचे रू.१९.५५ कोटी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा असल्याने स्थानिक स्तरावरील आर्किटेक्ट कंसल्टंट तातडीने नियुक्त करणे आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी नियुक्तीकरिता प्रस्तावित निविदाधारक मे. तक्षा कंसल्टंट, ठाणे यांना DPR चे सादरीकरण करण्यास सांगितले. त्यांचेवतीने **श्री. राहुल सुधीर समेळ, वास्तूविशारद तज्ञ सल्लागार, तक्षा कंसल्टंट ठाणे यांनी तयार केलेल्या प्रकल्पाचे सादरीकरण केले**. तसेच पुढे मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी जागतिक स्तरावरील निविदा प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर नियुक्तीकरिता प्रस्तावित निविदाधारक यांचेवतीने श्रृती बर्वे, एस.टी.सी. ग्रासरूट, कंसल्टंट, मुंबई यांना, मे. शहा टेक्निकल कंसल्टंट प्रा.लि., मुंबई यांनी तयार केलेल्या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यास सुचविले. ह्या निर्देशान्वये **श्रृती बर्वे, एस.टी.सी. ग्रासरूट, मुंबई यांनी** मे. शहा टेक्निकल कंसल्टंट प्रा.लि., मुंबई **यांनी तयार केलेल्या संकल्पनात्मक टिपणीचे सादरीकरण केले.**

वरीलप्रमाणे सादरीकरण केलेल्या प्रकल्पाची व संकल्पनात्मक टिपणीची समिती सदस्यांद्वारा प्रशंसा करण्यात आली व हे जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ प्रकल्प असल्यामुळे अशा प्रकारच्या सोयीसुविधांनी युक्त असा प्रकल्प तयार होत असल्याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच हे जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ व प्रकल्प असल्यामुळे प्रस्तावित बाबींशिवायही अधिक काही सुधारणा करण्याबाबत सदस्यांनी मत व्यक्त केले व प्रचार, प्रसिद्धी व विपणन (Marketing) यावरही भर देण्याची सूचना प्रो.निशी के. मुखर्जी, सन्माननीय सदस्य यांनी केली, जेणेकरून विदेशी पर्यटक या जागतिक दर्जाच्या पर्यटन स्थळाकडे आकृष्ट होतील. प्रकल्प जागतिक दर्जाचे असल्यामुळे प्रकल्पाचा दर्जा (Quality) अतिउत्तम असावा, प्रथमोपचार कक्ष व डॉक्टर यांची सोय असावी, गुन्हे प्रतिबंधक दक्षता पथक असावे, इत्यादी. मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय

उद्यान, बोरीवली यांनी समिती सदस्यांनी दिलेल्या सूचनांची नोंद घेतली व त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे समितीस हमी-वजा-आश्वासन दिले व मे. तक्षा कंसल्टंट, ठाणे यांच्या नियुक्तीबाबत शिफारस करण्याची व त्यांनी सादर केलेल्या DPR ला मंजूरी देण्याची विनंती कार्यकारी समितीला केली. तसेच मे. शहा टेक्निकल कंसल्टंट प्रा.लि., मुंबई यांनी सादर केलेल्या संकल्पनात्मक टिपणीला मंजूरी देण्यास विनंती केली.

सादरीकरणाअंती समितीद्वारा सविस्तर चर्चा करण्यात आली त्यात वरील **शासकीय पत्रान्वये सूचित करण्यात आलेल्या निसर्ग पर्यटन तज्ञ समितीची जागा आता महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाचे कार्यकारी समितीने घेतलेली असल्यामुळे** महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाच्या कार्यकारी समितीने चर्चा करून मंजूरी देण्यात यावी असे ठरविण्यात आले. शासन निर्णय क्रमांकःबैठक-२०११/ प्र.क्र.१७४/फ-५ दिनांक २४ ऑक्टोबर, २०११ नुसार निर्मित निसर्ग पर्यटन तज्ञ समितीमध्ये असणारे सर्व सदस्य या सभेला उपस्थित होते. **चर्चेअंती मे. तक्षा कंसल्टंट, ठाणे व मे. शहा टेक्निकल कंसल्टंट प्रा.लि., मुंबई यांचे नियुक्तीला शासनास शिफारस करण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच मे. तक्षा कंसल्टंट, ठाणे यांनी सादर केलेल्या DPR ला व मे. शहा टेक्निकल कंसल्टंट प्रा.लि., मुंबई यांचे संकल्पनात्मक टिपणीला महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची मान्यता देण्यात आली**.

**विषय क्र.२:- दिनांक २०/०२/२०१८ रोजी टकले सभागृह, वनभवन, नागपूर येथे संपन्न झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे**.

दिनांक २०/०२/२०१७ रोजी संपन्न झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत या कार्यालयाचे पत्र क्रमांकःव्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.१०/८६८/२०१७-१८ दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ अन्वये सर्व सभासदांना पाठविण्यात आलेला आहे. सदर कार्यवृत्तांतावर कोणत्याही सदस्यांकडून कोणत्याही विषयावर आक्षेप किंवा सुधारणा करणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. त्यानुसार सदर कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

**विषय क्र.३:- "निसर्गानुभव" योजनेबाबत अहवालाचे सादरीकरण व पुढील वर्षाचे नियोजन**.

सभेदरम्यान सन्माननीय समिती सदस्यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीपुढे विषयांकित प्रकरणी सदस्य-सचिव यांचेद्वारा खालील प्रमाणे माहिति देण्यात आली :-

तत्कालिन मा. अध्यक्ष, कार्यकारी समिती तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे मान्यतेने व मार्गदर्शनानुसार नागपूर / चंद्रपूर / गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात **"निसर्गानुभव"** कार्यक्रमांतर्गत एक दिवसीय पर्यावरण शिबीर आयोजित करण्यात आले आहेत. वनपरिक्षेत्र स्तरावर प्रत्येक जिल्ह्यातील वय ८ ते १२ शाळेच्या एकूण २,००० विद्यार्थ्यांना संसाधनांच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक शाळेकरिता एक इको-कॅम्प आयोजित करण्यात आले आहे. पर्यावरण संरक्षणाच्या उद्देशांची माहिती व अनुभवाचे माध्यमाने पारिस्थितीकीय तंत्राचे घटकांची व्याख्या, पर्यावरण संरक्षण, जैव विविधता, पक्षी दर्शन, वन औषधी आणि वन व्यवस्थापनाची सामान्य माहिती व अनुभव प्रदान करण्यात आले. हा कार्यक्रम राबविण्याकरिता अशासकीय संस्थांची मदत घेण्यात आली असुन हा कार्यक्रम उत्तम प्रकारे यशस्वी झाला असुन त्यास भरपूर प्रचार व प्रसिद्धी मिळाली आहे.

भविष्यातील पिढी पर्यावरणाप्रती जागरूक व्हावी व त्यांना निसर्ग व पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन योग्यरित्या व्हावे याकरिता हा कार्यक्रम पुढील आर्थिक वर्षात कॅम्पा निधीतून राबविण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता रू.१.१० कोटीची तरतूद देखील करण्यात आली आहे.

संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या एकूण ३३ जिल्ह्यांमध्ये ३५० वनक्षेत्रांमध्ये प्रति वनक्षेत्र २०० विद्यार्थी यानुसार वर्ष २०१८-१९ मध्ये सदर **"निसर्गानुभव"** कार्यक्रम राबविण्याचे नियोजित असुन त्यासाठी रू. ४.५० कोटीचा निधी कॅम्पा (CAMPA) योजनेतून उपलब्ध करून घेण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२/योजना /मनिपविमं/१५३/२०१८-१९ दिनांक ०७.०५.२०१८ अन्वये सादर करण्यात आला आहे. या कार्यक्रमामध्ये एकूण ७०,००० विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचे प्रस्तावित आहे.

चर्चेदरम्यान सदस्य सचिवांद्वारे स्पष्ट करण्यात आले की, सदर **"निसर्गानुभव"** कार्यक्रम मध्य प्रदेशामध्ये राबविण्यात येत असुन त्याच धर्तीवर आपल्याकडेही राबविण्यात येत आहे. समिती सदस्य तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा) यांनी **"निसर्गानुभव"** कार्यक्रमाबाबत मंडळाने जी एक पुस्तिका तयार केली त्या **पुस्तिकेच्या प्रति समितीच्या सर्व सदस्यांनाही पुरविण्याबाबत समितीस विनंती केली व समितीने ती मान्य केली.** तसेच चर्चेअंती समितीद्वारा पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

(१) प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर कार्यक्रमास मिळालेला प्रतिसाद व प्रसिद्धी विचारात घेता संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या एकूण ३३ जिल्ह्यांमध्ये ३५० वनक्षेत्रांमध्ये प्रति वनक्षेत्र २०० विद्यार्थी यानुसार **वर्ष २०१८-१९ मध्ये एकूण ७०,००० विद्यार्थ्यांना** सामावून घेण्याचे दृष्टीने

सदर **“निसर्गानुभव”** कार्यक्रम राबविण्यासाठी **रू. ४.५० कोटीचा निधी कॅम्पा (CAMPA) योजनेतून** उपलब्ध करून देण्यात यावा.

(२) तसेच चर्चेदरम्यान पुढे असा निर्णय घेण्यात आला की, जर **कॅम्पा (CAMPA) योजनेतून निधी उपलब्ध होणे अशक्य झाल्यास** सदर निधी निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या (२४०६-२२९५) **ह्या राज्यस्तरिय योजनेत प्रस्तावित करून उपलब्ध करून घेण्यात यावा व हा शालेय विद्यार्थ्यांसाठीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.**

(३) शालेय विद्यार्थी हे **८ ते १२ वर्ष वयोगटातील** असावेत.

(४) **निसर्गानुभव कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना ग्रीन आर्मीमध्ये** पंजिबद्ध करून घ्यावे.

(५) निसर्ग पर्यटन कार्यक्रमाचा प्रचार, प्रसिद्धी व विपणन (Marketing) यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांबाबत कॉफी टेबल बुक तयार करण्यात आली असली व जरी वेब साईटवर व मोबाईल ॲपवर सर्व निसर्ग पर्यटन स्थळांची माहिती / सेवा उपलब्ध करून देण्यात आली असली तरी निसर्ग पर्यटन या कार्यक्रमासाठी Brand Ambassador नेमण्याबाबत प्रयत्न करण्यात यावे.

विषय क्र. ४ **निसर्ग पर्यटन स्थळांच्या आराखड्यांना मंजुरी देण्याबाबत** –

या विषयांतर्गत श्री. व्ही. आर. खेडकर, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), कोल्हापूर यांनी **“यशवंतराव चव्हाण सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य, वन्यजीव विभाग, कोल्हापूर”** ह्या पर्यटन विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यास सुरवात केली तेंव्हा मा. अध्यक्षांनी चर्चा करून ह्या सादरीकरणास हरकत घेतली व पुढील प्रमाणे निर्देश दिलेत :-

(१) **नवीन निसर्ग पर्यटन विकास आराखडे समितीपुढे वेळेवर सादर करण्यात येऊ नयेत. तर ते योग्य मार्गे** म्हणजे उपवनसंरक्षक यांचेकडुन मुख्य वनसंरक्षक यांचेकडे, मुख्य वनसंरक्षक यांचेकडुन पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडे किंवा संबंधित अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व / पश्चिम यांचेकडुन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचेकडे सादर करण्यात यावेत. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी प्रकल्प आराखड्यांची छानणी करून खात्रीअंती प्रकल्प आराखडे कार्यकारी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करावेत.

(२) प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण हे पॉवर पॉईंट बुलेट फॉर्ममध्ये ठळक स्वरूपात असावे. बाबवार माहिती सादरीकरणात असु नये.

(३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी सादरीकरणासाठीचा एक उत्तम नमुना (Standard Format) तयार करावा व तो क्षेत्रिय कार्यालयांना पाठवावा.

वरील कारणास्तव सदर प्रकल्प आराखड्याबाबत **समितीद्वारा चर्चा करण्यात आली नाही.**

**विषय क्र. ४.१ :- अहिवंतगड किल्ला (दरेगांव वणी), ता. कळवण, जिल्हा नाशिक चा आराखडा.**

**उपवनसंरक्षक, पूर्व भाग नाशिक – मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक.**

सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण **श्री. राजन गायकवाड, सहाय्यक वनसंरक्षक, पूर्व भाग, नाशिक** यांनी केले.

त्यांनी स्पष्ट केले की, पूर्व भाग, नाशिक विभागांतर्गत निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास करणेकरीता **जिल्हास्तरीय योजनेतंर्गत सन २०१७-१८ ते २०२१-२२ एकूण ५ वर्ष कालावधीचा रु.३५.८३ लक्षचा** प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला असुन त्यास कार्यकारी समितीची **फक्त मान्यता हवी आहे.** प्रकल्पासाठी **लागणारा निधी जिल्हा नियोजन समितीकडुन उपलब्ध करून घेण्यात आलेला आहे.**

प्रकल्प आराखडयात वर्षवार खालीलप्रमाणे कामे (वनक्षेत्रामध्ये) प्रस्तावित केलेली आहेतः-

**<u>वर्ष २०१७-१८ : टप्पा क्रमांक-१ :-</u>**

| अ. क्र. | प्रस्तावित कामाचा प्रकार | अंदाजपत्रकीय रक्कम (रूपये) |
|---|---|---|
| १ | काळभुत कुंड क्रमांक-१ : साफसफाई व दुरूस्ती करणे. | २७११५ |
| २ | काळभुत कुंड क्रमांक-२ : साफसफाई व दुरूस्ती करणे. | २४४९७ |
| ३ | काळभुत कुंड क्रमांक-३ : साफसफाई व दुरूस्ती करणे. | ३५९७० |
| ४ | कोरड्या विहिरीची साफसफाई व दुरूस्ती करणे. | ३०७९६ |
| ५ | भुयारातील कुंडाची साफसफाई व दुरूस्ती करणे. | २९५६ |
| ६ | गायमुख कुंडाची साफसफाई व दुरूस्ती करणे. | ४५५८ |
| ७ | म्हैसतळेची साफसफाई व दुरूस्ती करणे. | १९३४८९ |
| ८ | नागतिर्थ तळेची साफसफाई व दुरूस्ती करणे. | १३४९२४ |
| ९ | दरवाजा घर भुयार क्र. १ : साफसफाई व दुरूस्ती करणे. | ३८०८३६ |
| १० | दरवाजा घर भुयार क्र. २ : साफसफाई व दुरूस्ती करणे. | २९२७६ |
| ११ | दरवाजा घर भुयार क्र. ३ : साफसफाई व दुरूस्ती करणे. | ३१६३७ |

| | | |
|---|---|---|
| १२ | दरवाजा घर भुयार क्र. ४ : साफसफाई व दुरूस्ती करणे. | ७१०४२ |
| १३ | रेलींग करणे भाग-१. | २५५६०० |
| १४ | रेलींग करणे भाग-२. | २७२६०० |
| १५ | रेलींग करणे भाग-३. | २९८२०० |
| १६ | रेलींग करणे भाग-४. | २९९९०० |
| १७ | रेलींग करणे भाग-५. | २३६९०० |
| १८ | पायवाट दुरूस्ती करणे – ५५० मीटर. | २०२९०० |
| १९ | पायवाट बनविणे – ३०० मीटर. | ११७५०० |
| २० | पायवाट दुरूस्ती करणे – १०० मीटर. | ४११०० |
| २१ | दारूखाना भागात सिडी बसविणे. | ४१५०० |
| २२ | किल्ल्यावर जातांना विविध ठिकाणी मार्गदर्शक फलक लावणे. | ५०००० |
| २३ | पर्यटकांसाठी रात्रीचे मुक्कामासाठी तंबु परविणे, संख्या-१०. | ४५०००० |
| २४ | पर्यटकांसाठी वाटाड्या/मार्गदर्शनासाठी १५ तरूणांना प्रशिक्षण. | २५००० |
| | एकूण : | ३२५८२९६ |
| | **टप्पा क्र.१ ची एकूण रू. लाखात :** | **३२.५८** |
| | **<u>वर्ष २०१८-१९ : टप्पा क्रमांक-२ :-</u>** | **(रू. लाखात)** |
| १ | मागदर्शकांसाठी रेस्क्यू साहित्य खरेदी करणे, संख्या-३. | ०.२५ |
| | **एकूण :** | **०.२५** |
| | **<u>वर्ष २०१९-२० : टप्पा क्रमांक-३ :-</u>** | |
| १ | औषधी वनस्पती संवर्धन व देखभाल. | ०.९० |
| | **एकूण :** | **०.९०** |
| | **<u>वर्ष २०२०-२१ : टप्पा क्रमांक-४ :-</u>** | |
| १ | तंबू साहित्य, औषधी वनस्पती संवर्धन, देखभाल व खरेदी. | १.०० |
| | **एकूण :** | **१.००** |
| | **<u>वर्ष २०२१-२२ : टप्पा क्रमांक-५ :-</u>** | |
| १ | तंबू साहित्य, औषधी वनस्पती संवर्धन, देखभाल. | १.१० |
| | **एकूण :** | **१.१०** |
| | **<u>टप्पा क्र. २ + ३ + ४ + ५ ची एकूण:</u>** | **३.२५** |
| | **<u>एकूण प्रकल्प आराखड्याची अंदाजपत्रकीय रक्कम :</u>** | **३५.८३** |

त्यांनी सादरीकरणादरम्यान स्पष्ट केले की, नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुका हा आदिसावीबहुल तालुका असुन या तालुक्याचा बहुतांश भाग हा पर्वतरांजींनी वेढलेला असुन

निसर्गरम्य वातावरणात येथील लोक राहतात. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धे शक्तीपीठ मानले जाणारे जगदंबा माता आदिमाया सप्तश्रृंगी मातेचे मंदिर श्री क्षेत्र सप्तश्रृंग गड देखील कळवण तालुक्यात आहे. त्याचेच पुढे डोगररांगात महातपस्वी योगी मार्कंडेय ऋषींचे मंदिर मार्कंडेय पर्वतावर आहे. या दोन्ही ठिकाणी दरवर्षी हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. याच डोंगररांगात नाशिक कडुन कळवणकडे येतांना अहिवंतगड किल्ला नजरेस पडतो. या किल्ल्याचा विकास झाल्यास सप्तश्रृंग गड व मार्कंडेय पर्वतावर येणारे भाविक सहजपणे अहिवंत गडावर येवु शकतात.

तसेच पुढे स्प्ष्ट केले की, **अहिवंतगड किल्ल्याचा विकासामुळे स्थानिक ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल**. प्रस्तावित विकास कामे झाल्यानंतर पर्यटकांच्या संख्येत वाढ होईल. वनसंरक्षण समिती प्रवेश शुल्क आकारणी करेल. स्थानिक रहिवाशी पर्यटकांना मार्गदर्शन, सामान वाहक आणि पर्यटकांना सहाय्यक ही कामे करू शकतील. या ऐतिहासिक ठेवा जपणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण किल्ल्याचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास झाल्यास आसपासचे **बेरोजगार तरूणांना / जनतेला रोजगार प्राप्त होवून गावाचा विकास होण्यास मदत होईल** व ऐतिहासिक वारस्याची जपणूक होईल.

**समितीद्वारा पुढीलप्रमाणे निर्देश दिले** :-

(१) कार्यकारी समितीपुढे **सादरीकरणासाठी विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक यांचेपेक्षा कनिष्ठ दर्जाचे अधिकाऱ्यांनी येऊ नये.** काही महत्वाच्या कार्यबाहुल्ल्यामुळे या दर्जाचे अधिकाऱ्यास सादरीकरणासाठी येणे शक्य नसल्यास, त्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांची **लिखित पूर्व-परवानगी घेऊनच कनिष्ठ दर्जाचे अधिकाऱ्यांनी** (**सहाय्यक वनसंरक्षक**) सादरीकरणासाठी यावे.

(२) **जोपर्यंत समितीद्वारे मंजुर झालेले जुने प्रकल्प पूर्ण होत नाहीत तोपर्यंत व्यवस्थापकीय संचालक**, **महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी समितीपुढे नवीन प्रकल्प आराखडे मंजुरीसाठी सादर करू नयेत**.

समितीद्वारा चर्चेअंती **पुढीलप्रमाणे निर्णय** देण्यात आलाः-

(१) वर्ष २०१७-१८ मध्ये जिल्हास्तरिय योजनेअंतर्गत (DPDC) सदर प्रकल्प आराखड्यास मंजुरी प्राप्त झाली असल्यामुळे व ह्या योजनेंतर्गतच (DPDC) प्रकल्पास निधी उपलब्ध झाला असल्यामुळे **प्रकल्प आराखड्यास समितीची मंजुरी देण्यात येत आहे.**

(२) प्रकल्प आराखड्यामध्ये प्रस्तावित स्ट्रक्चर हे दोन वर्षात खराब होण्यासारखे आहे, त्यामुळे त्याची योग्यरित्या देखभाल करण्याबाबत काळजी घेण्यात यावी.

(३) प्रकल्प आराखड्यातील प्रस्तावित बाबवार निधीचे आकडे हे **लाखांमध्ये दर्शविण्यात यावे**, एक रूपयापर्यंत आकडे दर्शविण्यात येऊ नयेत.

**वेळेवर सादर करण्यात आलेले विषय :**

**विषय क्र. १ :- समितीद्वारा पूर्वी मंजुर करण्यात आलेल्या सह्याद्री व्याघ्र प्रकल्प आराखड्यामध्ये सन २०१८-१९ च्या कार्यबाबीत सुधारणा करण्याबाबत.**

डॉ. विनीता व्यास, उपसंचालक, सह्याद्री व्याघ्र संरक्षित, कोल्हापूर (मुख्यालय-कराड) यांनी प्रकल्पाचे सादरीकरणादरम्यान समितीपुढे स्पष्ट केले की, सदर प्रकल्प आराखडा निसर्ग पर्यटन तज्ञ समितीने मागील दिनांक ०८/१०/२०१५ च्या सभेमध्ये सह्याद्री व्याघ्र प्रकल्प आराखडा मंजुर केलेला आहे. तथापि, सदर मंजुर आराखड्यानुसार कार्यान्वयन करतांना काही जमिनीबाबतच्या अडचणी उपस्थित झाल्या आहेत तसेच प्रकल्प क्षेत्रात असलेला उंच-सखल भुभाग यामुळे कामे करणे अशक्यप्राय होत आहे. हा प्रकल्प क्षेत्र बफर झोनमध्ये असुन त्यात ८ गावांचा समावेश आहे. हा एक स्वयंनिर्भर असा प्रकल्प आहे. यामध्ये जास्तीत जास्त ट्रेकींग टुरिझम विकसीत करता येते. ह्या सर्व बाबी विचारात घेवुन मंजुर प्रकल्प आराखड्यातील प्रस्तावित काही बाबींऐवजी इतर कार्यबाबींचा समावेश करून व मंजुर प्रकल्प निधीच्या अधीन राहुन, सुधारित कार्यबाबींना मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

चर्चेअंती पुढील प्रमाणेनिर्देश देण्यात आले :-

(१) मंजुर प्रकल्प आराखड्यामधील कोणत्या जुन्या कार्यबाबी आहेत व त्यांच्याऐवजी कोणत्या नवीन कार्यबाबी प्रस्तावित आहेत, याचा अर्थबोध होत नाही. त्यामुळे यानुसार सुधारित प्रस्ताव सादर करावा.

(२) मा. अध्यक्षानी स्पष्ट सूचना दिल्या की, प्रकल्प आराखडा तयार करतांना ह्या बाबींचा सांगोपांग विचार करूनच आराखडा सादर करणे गरजेचे होते.

(३) सुधारित कार्यबाबींना शासनाची मंजुरी आवश्यक राहील. तथापि, ह्या सुधारित कार्यबाबींना कार्यकारी समितीच्या पुढील सभेमध्ये मंजुरी मिळाल्यास, नवीन बाब / चालु बाब प्रस्तावाद्वारेही शासनाची मंजुरी घेता येईल.

(४) जमिनीबाबत खात्री करूनच प्रकल्प आराखडा तयार करणे आवश्यक होते.

(५) सुधारित प्रकल्प आराखडा जुन्या कार्यबाबी व त्याऐवजी प्रस्तावित नवीन सुधारित कार्यबाबींसह व मंजुर निधीच्या अधीन राहुन प्रस्ताव समितीच्या मंजुरीसाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई यांचेमार्फत सादर करण्यात यावा. त्यानंतरच प्रस्तावास मंजुरी देता येईल.

**मा. अध्यक्षांनी संपूर्ण प्रकल्पांच्या चर्चेदरम्यान दिलेल्या सर्वसाधारण सूचना** :-

(१) **नवीन निसर्ग पर्यटन विकास आराखडे समितीपुढे वेळेवर सादर करण्यात येऊ नयेत. तर ते योग्य मार्गे** म्हणजे उपवनसंरक्षक यांचेकडुन मुख्य वनसंरक्षक यांचेकडे, मुख्य वनसंरक्षक यांचेकडुन पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडे किंवा संबंधित अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व / पश्चिम यांचे शिफारसीसह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचेकडे सादर करण्यात यावेत. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी प्रकल्प आराखड्यांची छाननी करून खात्रीअंती प्रकल्प आराखडे कार्यकारी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करावेत.

(२) प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण हे पॉवर पॉईंट बुलेट फॉर्ममध्ये ठळक स्वरूपात असावे. सविस्तर माहिती सादरीकरणात असु नये.

(३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी सादरीकरणासाठीचा एक उत्तम नमुना (Standard Format) तयार करावा व तो क्षेत्रिय कार्यालयांना पाठवावा.

(४) कार्यकारी समितीपुढे **सादरीकरणासाठी विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक यांचेपेक्षा कनिष्ठ दर्जाचे अधिकाऱ्यांनी येऊ नये.** काही महत्वाच्या कार्यबाहुल्ल्यामुळे या दर्जाचे अधिकाऱ्यास सादरीकरणासाठी येणे शक्य नसल्यास, त्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांची **लिखित पूर्व-परवानगी घेऊनच कनिष्ठ दर्जाचे अधिकाऱ्यांनी (सहाय्यक वनसंरक्षक**) सादरीकरणासाठी यावे.

(५) जोपर्यंत समितीद्वारे मंजुर झालेले जुने प्रकल्प पूर्ण होत नाहीत तोपर्यंत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी समितीपुढे नवीन प्रकल्प आराखडे मंजुरीसाठी सादर करू नयेत.

(६) प्रकल्प आराखड्यातील प्रस्तावित बाबवार निधीचे आकडे हे **लाखांमध्ये दर्शविण्यात यावे,** एक रूपयापर्यंत आकडे दर्शविण्यात येऊ नयेत.

(७) मंजुर प्रकल्पांच्या पर्यटन स्थळांचे पुनर्विलोकन (Review) करण्यात यावे.

(८) मंजुर प्रकल्प निधी प्रकल्प कार्यान्वयनाअभावी ३-४ वर्ष पर्यंत पडून राहतो, असे होता कामा नये. कामे वेळेवर करण्यात येऊन निधीचा वापर वेळेवर करावा.

(९) संपूर्ण मंजूर प्रकल्पांचा आढावा घेऊन समितीच्या पुढील सभेमध्ये प्रगति अहवाल (Progress of action) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी सादर करण्यात यावा.

सरतेशेवटी श्री. एस. व्ही. माडभूषी, विभागीय वन अधिकारी, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी आभार प्रदर्शनाद्वारे नवनियुक्त मा. अध्यक्ष श्री. उमेश कुमार अग्रवाल, भा.व.से. तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमूख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अभिनंदन केले व सभेस पूर्णवेळ उपस्थित राहील्याबाबत त्यांचे व नवनियुक्त सदस्य श्री. अरूण तिखे यांचे आभार मानले. तसेच सभेस उपस्थित इतर समस्त पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानले व सभा समाप्त झाल्याचे घोषित केले.

( **महीप गुप्ता** )
**सदस्य-सचिव**, **कार्यकारी समिती**,
अ.प्र.मु.व.सं. तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर

*परिशिष्ट - १*

## दिनांक १४ मे, २०१८ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समिती व निसर्ग पर्यटन तज्ञ समितीच्या ६ व्या बैठकीमध्ये उपस्थितांची यादी

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समितीमधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्री. उमेश कुमार अग्रवाल | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| २. | श्री. ए. के. मिश्रा | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ३. | श्रीमती उषा राऊत | प्रतिनिधी सदस्य | प्रशासकीय अधिकारी<br>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांचे कार्यालय. |
| ४. | श्री. नितीन कोकोडकर | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ५. | श्री. विकास गुप्ता | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ६. | श्री. एम. के. राव | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई. |
| ७. | श्री. प्रशांत सवाई | प्रतिनिधी सदस्य | प्रादेशिक व्यवस्थापक, मपविमं, नागपूर ***तथा*** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ किंवा यांचे प्रतिनिधी. |
| ८. | श्री. संजय करकरे | सदस्य | सहाय्यक संचालक,<br>बी.एन.एच.एस.बी.-१, वंदना अपार्टमेंट, रामदासपेठ, नागपूर |
| ९. | प्रो. निशी के. मुखर्जी | सदस्य | ४६, रामदासपेठ, लोकमत बिल्डींग जवळ, नागपूर – ४४० ०१० |
| १०. | श्री. दिलीप आर.चिंचमलातपुरे | सदस्य | नयनतारा-२८, अद्यापक लेआऊट, जोग हॉस्पिटॅलिटीचे जवळ, मंगलमुर्ती चौक, रिंग रोड, नागपूर-४४००३६. |
| ११. | श्री. श्रीनिधी नांदेडकर | सदस्य | मे. श्रीनिधी नांदेडकर ॲण्ड असोसिएट, १०३-उत्कर्ष उमंग, अजनी चौक, नागपूर-४४० ०१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | श्री. अरूण तिखे | सदस्य | २९, रघटाटे लेआऊट, दाताळा रोड, रामनगर, चंद्रपूर - ०२ |
| १३. | श्री.  महीप गुप्ता | सदस्य-सचिव | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ***तथा*** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| १४. | श्री. अरूण ह. भगत | सदस्य | वन अभियंता तथा सदस्य, निसर्ग पर्यटन तज्ञ  समिती, नागपूर |
| १५. | श्री. विजय एन. कोल्हे | सदस्य | सहसंचालक, लेखा व कोषागारे तथा निमंत्रित सदस्य, निसर्ग पर्यटन तज्ञ समिती, कोषागार कार्यालय, नागपूर |